माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये**
**दाखल केलेली तक्रार**

## क्र.मुमाआ/नों.क्र.१४९१/२२/त.क्र.१४१ /२५/०१

श्री. सन्नी चव्हाण
रुम क्र.२३३, चाळ क्र.२०, गायकवाड नगर,
पी.वाय.थोरात मार्ग, चेंबूर, मुंबई – ४०००८९.

**विरुद्ध**

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (प.ज.वा.) पू. उ.
एल/पूर्व विभाग बृहन्मुंबई महानगरपालिका उप प्रमुख अभियंता
(प. ज. वा.) पूर्व उपनगरे यांचे कार्यालय, पंतनगर गॅरेज इमारत,
पंतनगर आगाराच्या मागे, ५ वा मजला,घाटकोपर (पू) मुंबई-४०००७५.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (प.ज.वा.) पू. उ.
(परि.५) बृहन्मुंबई महानगरपालिका उप प्रमुख अभियंता (प. ज. वा.)
पूर्व उपनगरे यांचे कार्यालय, पंतनगर गॅरेज इमारत,
पंतनगर आगाराच्या मागे, ५ वा मजला,घाटकोपर (पू) मुंबई-४०००७५.

**तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : १६.१२.२०२५**

| | | |
|---|---|---|
| तक्रारदार | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

प्रस्तुत प्रकरणी अपील क्रमांक १६४१/२१ यात दिनांक २३/११/२०२१ रोजी झालेल्या सुनावणीत तक्रारदार यांना शंभर पृष्ठांपर्यंतची माहिती विनामूल्य देण्याबाबत तसेच त्यानंतरची माहिती सशुल्क देण्याबाबतचे आदेश पारित करण्यात आले असून तक्रारदार श्री.चव्हाण यांनी माहितीचे अवलोकन केले असून १०० पृष्ठांची माहिती चिन्हांकित देखील केली होती ती त्यांना टपालाद्वारे पाठवण्यात येईल असे आश्वासित देखील करण्यात आले होते. मात्र अद्यापही उपरोक्त माहिती अप्राप्त आहे.

ही बाब लक्षात घेता विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (पजवा) पूर्व/उपनगरे यांना असे निर्देश देण्यात येत आहेत की, त्यांनी वरील आदेश प्राप्त झाल्यानंतर **सात दिवसाच्या आत** दि.२३/११/२०२१ रोजी पारित आदेशाचे पूर्ण अनुपालन करून त्याचा एक अनुपालन अहवाल सादर करावा अन्यथा **कलम २० (१) व २० (२) अन्वये त्यांच्याविरुद्ध कारवाई करण्यात येईल.**

**आदेश**

**१.वरील विवेचनानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी.**
**२.वरील तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission Maharashtra

**( राहुल भा. पांडे )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : १६.१२.२०२५**